राज्यातील आदिवासी क्षेत्रातील विद्युतीकरणासाठी लागणा-या पायाभुत सुविधांतर्गत पालघर जिल्हयातील जव्हार-४ येथील १३२ केव्ही उपकेंद्र उभारण्यासाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता निधी वितरीत करण्याबाबत. (लेखाशिर्ष २८०१ ५०८९)

महाराष्ट्र शासन.
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र.क्र.२४ / कार्यासन.६.
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: - ०६ फेब्रुवारी, २०१८.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र. क्र. ६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७..
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र. ९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७.
४) उद्योग,उर्जा व कामगार विभाग,नस्ती क्र. निधीवी - २०१८ /प्र. क्र. ०८ / ऊर्जा -३.

शासन निर्णय -

राज्यातील आदिवासी क्षेत्रातील विद्युतीकरणासाठी लागणा-या पायाभुत सुविधांतर्गत पालघर जिल्हयातील जव्हार-४ येथील १३२ केव्ही उपकेंद्र उभारण्यासाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्र.टी-५, २८०१, वीज, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ८०- सर्वसाधारण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०३) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादीत यांना अनुदान (२८०१ ५०८९) ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीकरिता अनुदान या लेखाशिर्षाखाली रु.१८२२.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

उद्योग उर्जा व कामगार विभागाने वाचा क्र. ४ येथील नस्तीवर प्रस्तावित केल्यानुसार राज्यातील आदिवासी क्षेत्रातील विद्युतीकरणासाठी लागणा-या पायाभुत सुविधांतर्गत पालघर जिल्हयातील जव्हार-४ येथील १३२ केव्ही उपकेंद्र उभारण्यासाठी आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता मागणी क्र.टी-५, २८०१, वीज, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना, ८०- सर्वसाधारण, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) (०३) महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादीत यांना अनुदान (२८०१ ५०८९) ३५- भांडवली मत्तेच्या निर्मितीसाठी सहायक अनुदान या लेखाशिर्षाखाली रु. १८२२.०० लाख या अर्थसंकल्पित रकमेच्या ७० % च्या मर्यादेत **रु.१२७५.४० लाख (रुपये बारा कोटी पंचाहत्तर लाख चाळीस हजार फक्त)** इतका निधी नियंत्रक अधिकारी, प्रधान सचिव, (उर्जा) उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

३. प्रकरणी नियंत्रक अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय /उपलेखाशिर्षनिहाय साध्य झालेले भौतिक उद्दिष्टाबाबतची माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी विकास व ग्राम विकास व जलसंधारण विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

४. नियंत्रक अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात, अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी घटक कार्यक्रम क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी, जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर संनियंत्रण ठेवता येईल.

५. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या **वाचा** क्र.१ व क्र. २ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत असून वरील शासन निर्णयातील अटींची पुर्तता होत असल्याची उद्योग उर्जा व कामगार विभागाने खात्री करावी.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०६१७१५५७०४२४ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.02.06 18:23:45 +05'30'

रविंद्र दि. औटे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. प्रधान सचिव (उर्जा),उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे /नाशिक / अमरावती / नागपूर.
४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
५. महालेखापाल (लेखापरिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
६. वित्त विभाग (अर्थ-१९) / (व्यय-१४) मंत्रालय, मुंबई-३२
७. निवडनस्ती, कार्यासन- ०६, आदिवासी विकास विभाग.